*सुधीर मुनगंटीवार यांचा 10 ऑक्टोबर रोजी चंद्रपूर तालुक्यात प्रचार दौरा*
*नागाळा, अजयपूर, बोर्डा येथे जाहीर सभांना संबोधित करणार*

बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील भाजपा-शिवसेना-रिपाई (आ)-रासप मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार 10 ऑक्टोबर रोजी चंद्रपूर तालुक्यात नागरिकांची भेटीगाठी व प्रचार सभांच्या माध्यमातुन संवाद साधणार आहे.

सुधीर मुनगंटीवार सायं. 4.00 वा. चिचपल्ली, सायं. 4.30 वा. जांभर्ला, सायं. 5.00 वा. नंदगूर, सायं. 5.30 वा. हळदी या गावांमध्ये नागरिकांशी भेटी घेत संवाद साधणार आहे तर सायं. 6.00 वा. नागाळा, सायं. 7.00 वा अजयपूर तर रात्री 8.00 वा. बोर्डा येथे जाहीर सभांना ते संबोधित करतील. या दौ-यात त्यांच्यासह भाजपा नेते रामपाल सिंह, जिल्हा परिषद सदस्य गौतम निमगडे, पंचायत समितीचे उपसभापती चंद्रकांत धोडरे, भाजपा चंद्रपूर तालुकाध्यक्ष हनुमान काकडे, आदिवासी आघाडीचे नेते अशोक अलाम, इम्रान पठाण, अरूण गेडाम, वासुदेव गावंडे, दिपक खनके आदी भाजपा, शिवसेना, रिपाई (आ) महायुतीच्या पदाधिका-यांची उपस्थिती राहणार आहे. सुधीर मुनगंटीवार यांच्या दौ-यादरम्यान आयोजित जाहीर सभांना नागरिकांनी मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन भाजपा चंद्रपूर तालुका शाखेतर्फे करण्यात आले आहे.